लोकमत

# आंतरराष्ट्रीय हवामान परिषद औरंगाबादेत

## १४ ते १६ दरम्यान चर्चासत्र : अमेरिका, इंग्लंड, इजिप्त आदी देशांतील शास्त्रज्ञांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद** : महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठे आणि जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १६ डिसेंबरदरम्यान शहरात आंतरराष्ट्रीय हवामान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

'जागतिक हवामान बदल व त्यांचे कृषी आणि जलक्षेत्रावर होणारे परिणाम' या विषयावर या परिषदेत चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. १४ रोजी सकाळी १० वाजता एमजीएम कॉलेज येथील रुक्मिणी सभागृहात परिषदेचे उद्घाटन होणार आहे. पद्मभूषण डॉ. आर.एस. परोडा, निति आयोगाचे डॉ. रमेशचंद्र, चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरु तसेच वाल्मीचे महासंचालक गोसावी, महिकोचे अध्यक्ष राजू बारवाले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या परिषदेत अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, श्रीलंका, व्हिएतनाम, बांगलादेश, नेपाळ आदी देशांतील नामवंत शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. यासाठी देश-विदेशांतून ८०० पेक्षा अधिक संशोधनपर निबंध प्राप्त झाले आहेत. ६०० पेक्षा अधिक शास्त्रज्ञ व संशोधक विद्यार्थी चर्चासत्रात सहभागी होणार आहेत.

विविध विषयांवरील चर्चासत्रात प्रामुख्याने हवामान बदल, कृषी क्षेत्रावर होणारे परिणाम, जल क्षेत्रावर होणारे परिणाम, मत्स्य व पशू यावर होणारे परिणाम तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांची हवामान बदलावर मात करण्याची उपाययोजना आदी आठ वेगवेगळ्या सत्रांत (पान ५ वर)

### ॲग्रोक्लायमॅटिक ॲटलास पुस्तकाचे प्रकाशन

- गेल्या दोन दशकांत हवामानात झालेले बदल आणि त्या पार्श्वभूमीवर सद्य:स्थितीत कोणती पीकपद्धती कोणत्या विभागाला फायदेशीर ठरेल, याचा जिल्हानिहाय आढावा 'ॲग्रोक्लायमॅटिक ॲटलास'(कृषी हवामान नकाशाचे पुस्तक) घेण्यात आला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन परिषदेत होणार आहे.

# आंतरराष्ट्रीय हवामान परिषद औरंगाबादेत

विविध संशोधनपर निबंधांचे सादरीकरण होणार आहे. चर्चासत्रात यावर सखोल शास्त्रीय चर्चा होणार असून, हवामान बदलावर मात करून क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी विविध नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंबंधी उपाययोजना सुचविल्या जाणार आहेत.

याचा उपयोग शेतकरी, शास्त्रज्ञ, संशोधक यांना पुढील नियोजनाची दिशा ठरविण्यासाठी होणार आहे.